नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २९/१२/२०२५ (सोमवार )**

---

# मुख्य सचिवांच्या राष्ट्रीय परिषदेत मा. श्री. हर्ष पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी केले 'MARVEL' प्रकल्पाचे सादरीकरण

दिनांक २६ ते २८ डिसेंबर २०२५ रोजी नवी दिल्ली येथे मा. पंतप्रधान, भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडलेल्या मुख्य सचिवांच्या पाचव्या राष्ट्रीय परिषदेत महाराष्ट्र राज्याच्या वतीने तंत्रज्ञान क्षेत्रात राबवण्यात येत असलेल्या कृत्रिम बुध्दीमत्ता (AI) आधारीत 'MARVEL' – (Maharashtra Research & Vigilance for Enhanced Law Enforcement Limited ) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले. मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी या परिषदेत उपस्थित राहून या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणी बद्दल माहिती दिली.

मार्च २०२४ रोजी मध्ये 'MARVEL' ची स्थापना झाली असुन 'MARVEL' ने पूर्ण केलेल्या नाविन्यपुर्ण प्रकल्पांपैकी एक म्हणजे भारतातील पहिला AI जिल्हा – सिंधुदुर्ग. सिंधुदुर्ग जिल्हा प्रशासनाच्या सात विभागांमध्ये (आरोग्य, कृषी, मत्स्यव्यवसाय, महसूल, वन, पोलिस, परिवहन) विभागांमध्ये 'MARVEL' AI द्वारे उपाययोजना अंमलात आणण्यात आल्या. या ‘AI जिल्हा – सिंधुदुर्ग’ मॉडेलचा अभ्यास यापूर्वी नीती आयोगाने भारत सरकारच्या आकांक्षी जिल्हा कार्यक्रमांतर्गत (Aspirational Districts Programme) देशभर पुनरुत्पादनासाठी केला होता. या पार्श्वभूमीवर MARVEL ला मुख्य सचिव परिषदेत आपले कार्य सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले. 'MARVEL' चे सीईओ व नागपूर ग्रामीणचे

पोलीस अधिक्षक मा. श्री. हर्ष ए. पोद्दार यांनी एसपीव्हीचे प्रतिनिधित्व केले. देशभरातील अनेक उपक्रमांमधून निवडलेल्या फक्त पाच टेक–इन–गव्हर्नन्स उपक्रमांपैकी 'MARVEL' एक होते.

'MARVEL' ही महाराष्ट्र सरकारची AI – केंद्रित विशेष उद्देश संस्था (Special Purpose Vehicle – SPV) आहे. मार्च २०२४ मध्ये विविध शासकीय विभागांसाठी सुरक्षित, राज्य–स्वामित्वाधारित AI उपाययोजना विकसित व अंमलात आणण्यासाठी तिची स्थापना करण्यात आली. भारतामधील पहिली संस्थात्मक राज्यस्तरीय AI संस्था म्हणून MARVEL नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा जबाबदार वापर सुनिश्चित करत डेटा सार्वभौमत्व, सुरक्षितता व सार्वजनिक विश्वास जपते. महाराष्ट्र राज्याच्या मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एका अधिकार प्राप्त समितीद्वारे MARVEL चे संचलन केले जाते. या उपक्रमाला Microsoft आणि IBM सारख्या जागतिक आघाडीच्या कंपन्यांचे तांत्रिक सहकार्य लाभले आहे. भारतातील पहिला AI जिल्हा म्हणुन सिंधुदुर्ग जिल्ह्याला विकसित करण्याचे काम, कायदा व सुव्यवस्था, गुन्हे नियंत्रण आणि देखरेखीसाठी, सामाजिक समस्यांचे निराकरण, मानव–प्राणी संघर्ष कमी करणे, मत्स्यव्यवसाय प्रशासन सुधारणे आणि शेतीमध्ये या तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात येत आहे. सार्वजनिक प्रशासनातील नाविन्यपूर्ण प्रयोगासाठी MARVEL ला एस.एस. गडकरी स्मृती पुरस्कार ( IIPA ) देऊन सन्मानित करण्यात आले आहे. आज MARVEL हा उपक्रम सक्षम शासनासाठी राष्ट्रीय आदर्श संकल्पना ( blueprint) म्हणून उदयास येत आहे.


MARVEL
Maharashtra Research & Vigilance for Enhanced Law Enforcement Limited
NITI Frontier Tech Hub
सत्यमेव जयते
Government of India
मुख्य सचिवों का
पाँचवां राष्ट्रीय सम्मेलन
Fifth National Conference of Chief Secretaries
26-28 दिसंबर, 2025
नई दिल्ली
26-28 December, 202
New Delhi
TRANSFORMING Governance WITH AI
MARVEL
Maharashtra Research & Vigilance for Enhanced Law Enforcement Limited
Government of Maharashtra
Maharashtra >> Research & Vigilance for Enhanced Law Enforcement Limited
MARVEL
AI-generated content

# अवैधरित्या विनापरवाना विदेशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, दोन आरोपी अटक
# १० लाख २९ हजारांचा मुद्देमाल जप्त, केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक २९/१२/२०२५ रोजी केळवद पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, **कारने अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक केली** जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ पोलीस स्टेशन केळवद समोर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान चारचाकी वाहन एम. एच. २७ डि.ए. ५१९७ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यात विदेशी दारू मिळुन आली. आरोपी क्रं **१) मुकेश राधेलाल जैस्वाल, वय ३९ वर्ष (चालक), क्रं २) अक्षय जयवंत नांदुरकर, वय २५ वर्ष, दोन्ही रा. वार्ड नं ३ गार्डन चौक कळंब ता. कळंब, जि. यवतमाळ हे अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष BLUE OFFICER CHOICE WISKEY, McDowellS NO 1 RUM, OLD MONK RUM अशा विविध कंपनीची विदेशी दारू किंमती २,२४,०३२ /— रूपये, महींद्रा कंपीनीची कार एम एच २७ डि ए ५१९७ आणि एक ॲन्ड्राईड मोबाईल असा एकुण किंमती १०,२९,०३२/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन केळवद येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दोन्ही आरोपीतांना पोलीसांनी अटक केली आहे.**




## खुनाच्या गुन्हयातील आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली आजन्म कारावासाची शिक्षा

**पो.स्टे. काटोल**:— फिर्यादी नामे पंचफुला नारायण अडकने, वय ४८ वर्षे, रा—ईसापूर खुर्द ता काटोल यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन काटोल येथे अप क्र. ३२९/२०२२ कलम ३०२ भादंवि अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत यप्रमाणे आहे की, सदर घटना दिनांक १३/०५/२०२२ रोजी मौजा ईसापुर खुर्द ता काटोल येथे मृतकाचे राहते घरी घडली आहे. फिर्यादीची मुलगी मृतक नामे सौ. चित्रा संदिप घोरमाडे, वय ३२ वर्ष, रा.ईसापूर खु. ता. काटोल आणि आरोपी संदिप पद्माकर घोरमाडे, वय ४२ वर्ष, रा. ईसापूर खु., ता. काटोल हे पती पत्नी असुन आरोपी हा नेहमी दारू पिण्याच्या सवयीचा असुन तो मृतक पत्नी सोबत कोणत्या ना कोणत्या कारणा वरून

वादवीवाद करून तिच्या चारित्र्यावर संशय घेत होता. नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने त्याचे मृतक पत्नीसोबत वादविवाद करून तीच्या चारित्र्यावर संशय घेवून कोणत्यातरी धारदार शस्त्राने वार करून जिवानीशी ठार केले, अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोद होता.

**श्री महादेव आचरेकर, पोलीस निरीक्षक, नेम पोलीस स्टेशन काटोल यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. आज दिंनाक २९/१२/२०२५ रोजी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायधीश श्री दिनेश सुराणा यांनी नमुद आरोपी नामे संदिप पद्माकर घोरमाडे, वय ४२ वर्ष, रा. ईसापूर खु., ता. काटोल यास कलम ३०२ भादवी मध्ये आजन्म कारावास व २०,००० /— रू. दंड , दंड न भरल्यास ३ महिने साधा कारावास ही शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्री जी. एन.दुबे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोलीस हवलदार/ ८२ बाबा नेवारे पो. स्टे. काटोलयांनी मदत केली आहे.

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची विक्री साठी साठवणुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, पारशिवणी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवणी**:— दिनांक २७/१२/२०२५ रोजी पारशिवणी पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, मुकेश दिलीपजी गजभिये, रा. इंदिरा नगर, बोरबन, पारशिवनी याने त्यांच्या पानठेल्या मध्ये महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुंगधीत तंबाखु, पानमसाला मिश्रीत सुपारीचे पावडर विक्री करीता साठा करून ठेवले आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा इंदिरा नगर, बोरबन, पारशिवनी येथे जावुन पंचासमक्ष आरोपीच्या पानठेल्याची झडती घेतली असता महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु आणि पानमसाला मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष एकुण ८.२३४ किलो प्रतिबंधीत पान मसाला व सुंगधीत तंबाखु किंमती ९,६०५ /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे पारशिवणी येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला

आहे. **आरोपी नामे मुकेश दिलीपजी गजभिये, वय. ३३ वर्ष , रा. इंदिरा नगर, बोरबन, पेंचरोड, ता. पारशिवनी जि. नागपुर याला अटक करण्यात आली.**

## नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे दिनांक २४/१२/२०२५ ते दि. ३१/१२/२०२५ रोजीपर्यंत राबविण्यात येत आहे ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह ,अवैध दारू बाबत विशेष मोहीम

## विशेष मोहीमे अंतर्गत करण्यात आल्या मोटर वाहन अधिनियम अन्वये ३१४ कारवाई आणि अवैध दारू बाबत ११ गुन्हे दाखल

**नविन वर्षा अनुषंगाने नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या विशेष मोहीमे अंतर्गत दिनांक २८/१२/२०२५ रोजी मोटार वाहन कायदा कलम १८५ अन्वये ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह च्या ४६ कारवाई, तसेच विना हेल्मेट, विना परवाना, ओव्हर स्पीडच्या आणि इतर २६८ कारवाई अशा एकुण ३१४ कारवाई केल्या आहे.**

त्याचप्रमाणे सदर विशेष मोहीमे अंतर्गत दिनांक २८/१२/२०२५ रोजी अवैध दारू विक्रेते, दारू काढणारे तसेच सेवन कारणाऱ्यांवर कारवाई करत महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये विविध पोलीस स्टेशन अंतर्गत **एकुण ११ गुन्हे नोंद** करण्यात आले असुन सदर कारवाईत ९२७० मिली देशी दारु, ६१ लीटर मोहाफुल दारू, तसेच इतर साहीत्य असा **एकुण १०,२७०/— रूपयांचा मुद्देमाल** जप्त करून **एकुण ११ आरोपी** यांविरूद्ध गुन्हे नोंद करण्यात आलेले आहे. नाशवंत मुद्देमाल पंचनामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.

**मद्यप्राशन करून वाहन चालवितांना चालक मिळून आल्यास त्यांच्यावर मोटार वाहन कायदया अन्वये कारवाई करण्यात येईल सदर प्रकरणात मा न्यायालयाकडुन १०,०००/— रूपयांपर्यंत दंड होवु शकतो. नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे संपुर्ण जिल्हयातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नववर्ष, तसेच इतर सणोत्सव आनंदात साजरा करावा परंतु स्वसुरक्षा म्हणुन वाहन चालवितांना मद्यप्राशन करून वाहन चालवू नये, हेल्मेट चा वापर करावा, वाहतुक नियमांचे पालन करावे. तसेच पालकांनी त्यांच्या अल्पवयीन पाल्यांना दुचाकी मोसा/चारचाकी वाहन चालविण्यास देवू नये अन्यथा चालकांविरूद्ध मोटार वाहन कायदयांन्वये गुन्हे दाखल करून कायदेशिर कारवाई करण्यात येईल.**

# कोंबडयांची झुंज लावुन जुगार खेळणाऱ्यांवर गुन्हा नोंद. २ लाख २२ हजारांचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक २८/१२/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा बोरगाव कलांद्री शिवार येथे काही इसम कोंबडयाची झुंज लावून पैशांचा हारजितचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे उमरेड पोलीस घटनास्थळी पोहचले असता, काही इसम कोबडयांच्या पायाला धारदार काती बांधुन त्यांच्या झुंज लावुन पैशांचा हारजितचा खेळ खेळतांना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी क्र. १) हरिदास किसन शेंडे, वय ४० वर्ष, रा. वडेगाव उमरेड, २) उमेश गोमा करुटकर, वय ४० वर्ष, रा. बेलसाखरा उमरेड ३) संदिप बापुराव हुलके, वय ४० वर्ष, रा. बेलसाखरा उमरेड ४) रामाजी साधु मेश्राम, वय ६० वर्ष, रा मोहपा उमरेड ५) संदिप आनंदराव पवार, वय २५ वर्ष, रा. सेलु जि. वर्धा ६) संदिप महादेव वरठी, वय ३६ वर्ष, रा. बेलसाखरा उमरेड ७) कन्हैया रामराव जाधव, वय ३८ वर्ष, रा. बेलसाखरा उमरेड ८) लखन जीवन जाधव, वय ३४ वर्ष, रा. मसाळा उमरेड ९) किसन बापुराव बचाले, वय ४८ वर्ष, रा. वेलयाखरा, उमरेड १०) दिलीप जीवन जाधव, वय ३१ वर्ष, रा. मसाळा उमरेड** यांना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून चार दुचाकी वाहने, रोख रक्कम २६००/—रूपये तसेच डावावर नगदी ११६०/— रुपये, ०३ कोंबडे, ०२ काती असा एकुण २,२२,२६०/— रूपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे. आरोपी नामे क्र. १) ते १०) यांच्याविरूद्ध पोलीस स्टेशन उमरेड येथे कलम १२ (ब) महाराष्ट्र जुगार कायदया अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




# अल्पवयीन अपहृत मुलीचा घेतला शोध ,अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन काटोल येथे दिनांक २६/११/२०२४ रोजी अप क्र १००६/२०२४ कलम १३७(३), १४३ भा.न्या.सं अन्वये दाखल गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलीचा शोध लागत नव्हता. नमुद गुन्हयातील अपहृत मुलगी, वय १७ वर्षे हीचा शोध घेण्यासाठी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने सदर गुन्हयाचा तपास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांचे कडे वर्ग करण्यात आला. श्री मिलींद तायडे, प्रभारी अधिकारी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात पोउपनि श्री मंगेश वानखडे, मपोहवा ज्योती वानखेडे, मपोहवा अर्चना कांबळे, पोशि

पन्नालाल बटाउवाले त्यांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास केला. नमुद गुन्हयातील अपहृत मुलीचा गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या मदतीने शोध घेवुन दिनांक २७/१२/२०२५ रोजी नागपुर येथुन ताब्यात घेतले आहे. अल्पवयीन बालीकेला पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास काटोल पोलीस करीत आहेत.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**